MHAH020016492024

**नियमित दिवाणी दावा क्र.४३९/२०२४ मधील नि.क्र.५ वरील आदेश.**

प्रस्तुत अर्ज वादी यांनी प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**वादींचे असे कथन आहे की,**

२. मौजे तिसगांव, ता. पाथर्डी, जि.अहमदनगर येथील जमीन मिळकत जुना सर्वे क्र.१२६ याचा नवीन गट क्र.२९६ ज्याचे क्षेत्र ७ हे ५९ आर ज्याच्या चतुःसिमा दावा कलम १ मध्ये दिलेल्या आहेत. या मिळकतीमधील तिसगांव–नगर रोडलगत ग्रामपंचायत हददीतील १९ X १५ फूट या जागेवर वीट बांधकाम व छताला पत्रे टाकलेले आहेत. ही मिळकत व्यवसायासाठी वादीच्या ताब्यात आहे आणि या दाव्याचा विषय आहे.

३. दावा मिळकत मुलतः शासनाच्या मालकीची असून दरम्यान त्यांनी प्रतिवादी क्र.३ जिल्हा परिषद यांच्याकडे वर्ग केलेली होती. प्रतिवादी क्र.३ ने (तत्कालीन लोकल बोर्ड) दि.०९.०९.१९५० रोजी ठराव करुन सदर मिळकत प्रतिवादी क्र.७ तिसगांव ग्रामपंचायतीस वर्ग केलेली आहे. तेव्हापासून सदर मिळकत ग्रामपंचायतीकडे गुरे चारण्यासाठी सोपविण्यात आली होती. त्यानुसार ग्रामपंचायतीचे नाव ७/१२ उता–यास लागलेले आहे. तिसगांवची लोकसंख्या वाढली, त्यामुळे गावठाण क्षेत्र वाढले. या मिळकतीसमोरच हायस्कूल, तलाठी कार्यालय, जनावरांचा दवाखाना, मराठी शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, टेलिफोन कार्यालय आणि इतर कार्यालयांसाठी ग्रामपंचायतीने सदर जागा संबंधितांच्या ताब्यात दिलेली आहे. काळाच्या ओघात गुरे चारण्यासाठी सार्वजनिक जागेची आवश्यकता राहिलेली नव्हती व नाही.

४. वादीचे कुटूंब तिसगांव येथील असल्यामुळे आणि त्यांना व्यवसायासाठी जागा नसल्यामुळे वादीने सन २००५ मध्ये ग्रामपंचायतीकडे व्यवसायासाठी जागा मिळावी असा अर्ज केला. त्यावर ग्रामपंचायतीच्या सभेमध्ये ठराव होऊन वादीस १९ x १५ फूट जागा दरमहा रु.२५०/– भाडे तत्वावर व्यवसायाकरीता ताब्यात दिलेली आहे. वादीने सदर जागेत स्वतः बांधकाम करुन **(श्रीनिवास आईस्क्रीम व केक शॉप)** व्यवसाय सुरु केलेला आहे.

५. दरम्यान तिसगांव येथील गट क्र.२९६ बाबत या प्रतिवादींविरुध्द गावातील नागरिक प्रतिवादी क्र.९ राजाराम वाल्मिक गारुडकर यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे जनहित याचिका क्र.४/२०२२ दाखल केली होती. त्यामध्ये वादी व इतर

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

व्यवसायिकांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले आहे आणि सदरचे अतिक्रमण प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी दुर करावे अशी मागणी केली होती. प्रतिवादी क्र.९ यांनी कोणतीही सत्य परिस्थिती नमूद केलेली नव्हती. त्या याचिकेमध्ये वादी व इतर दुकानदार सामील असले तरी त्यांना कोणतीही संधी देण्यात आली नव्हती. मात्र जिल्हा परिषदेवर सर्व बाबी पडताळून अहवाल सादर करण्याची जबाबदारी देण्यात आली. या याचिकेमध्ये दि.१७.०८.२०२३ रोजी आदेश होऊन प्रतिवादी क्र.४ यांनी चौकशी करुन प्रतिवादी क्र.३ यांच्याकडे अहवाल सादर करावा असे निर्देश देण्यात आले. प्रतिवादी क्र.४ यांनी कोणतीही रेकॉर्डची पहाणी न करता दि.०८.०१.२०२४ रोजी आदेश करुन अतिक्रमण काढावे असे वादी व इतरांना कळविले. त्यानंतर वादी व काही लोकांनी उच्च न्यायालयात पुन्हा याचिका दाखल केली आणि दावा मिळकतीवर त्यांचा कायदेशीर ताबा असल्याचे कथन केले. ब–याच याचिका दाखल झाल्यामुळे त्यामध्ये एकत्रित आदेश करण्यात आला. मात्र प्रतिवादी क्र.४ यांनी पुन्हा दि.१४.०५.२०२४ रोजी आदेश करुन वादी व इतरांनी दि.२३.०५.२०२४ पूर्वी अतिक्रमण काढून घ्यावे असे कळविले. त्यानंतर पुन्हा काही लोकांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या. सदर याचिका दि.१३.०६.२०२४ रोजी निकाली होऊन मिळकतीच्या संदर्भात दाद मागायची असेल तर वैयक्तिकरित्या दावे दाखल करावेत असे निर्देश देण्यात आले. त्यानुसार वादीने दावा दाखल केला आहे.

६. वादीस प्रतिवादीने ठरावानुसार व्यवसायासाठी जागा भाडयाने दिलेली आहे. त्यामुळे वादीचा ताबा कायदेशीर आहे. वादी नियमित भाडे भरतो, ग्रामपंचायतीने त्याबाबत पावत्याही दिलेल्या आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र.४ यांनी दिलेली नोटीस बेकायदेशीर आहे. म्हणून कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय ग्रामपंचायत मिळकतीवरील बांधकाम पाडू शकत नाही. त्यांनी असे केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे आणि वादीच्या हक्कावर बाधा येणार आहे. दावा मिळकतीमध्ये तो भाडेकरु आहे म्हणून त्याला दावा मिळकतीतून बेदखल करण्यात येऊ नये आणि वादीच्या व्यवसायास हरकत अडथळा करु नये म्हणून वादीने प्रस्तुत दावा दाखल केला आहे. दरम्यान तशाच प्रकारचा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळावा म्हणून सदर अर्ज दिलेला आहे.

७. प्रतिवादी क्र.२ यांनी नि.१८ अन्वये म्हणणे दाखल करुन वादींचे कथन नाकारले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर दाव्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, नोंदणी कायदा, कराराचा कायदा यातील तरतुदींची बाधा येते. मिळकतीचे वर्णन मोघम स्वरुपाचे असून ते अपुरे आहे. त्यामुळे दावा मिळकतीचे स्थानांकन निश्चित होत नाही. या सर्व कारणास्तव दावा रद्द होण्यास पात्र आहे.

८. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, मौजे तिसगांव येथील गट क्र.२९६ मधील अतिक्रमणासंदर्भात वादी यांनी रिट याचिकेमध्ये झालेल्या आदेशाच्या अनुषंगाने दावा दाखल

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

www.ecourtsindia.com

केलेला आहे. परंतू दावा दाखल करताना त्यांनी महत्त्वाच्या बाबी न्यायालयापासून लपवलेल्या आहेत. सदर गट क्रमांकाच्या ७/१२ उता–यावर सरपंच ग्रामपंचायत तिसगाव यांच्या नावे ७ हे. १९ आर अटीशर्तीवर दिल्याचे दिसून येते. फेरफार क्र.१२१७ अन्वये पूर्वीचा सर्वे क्र.१२६ क्षेत्र ७ हे. ८९ आर ही जमीन शासनाने सरपंच, ग्रामपंचायत तिसगांव यांच्या ताब्यात दिलेली आहे. सर्वे क्र.१२६ चा नवीन गट क्र.२९६ झालेला आहे. फेरफार क्र.२१५४ नुसार सदर जमीन अटी शर्तीवर निहित केलेली आहे. यामधील अट क्र.३ नुसार 'अशा चराऊ जमीनीचा पंचायतीने केलेला भाडेपट्टा, विक्री किंवा इतर रितीने केलेली तबदीली कलेक्टरच्या आगाऊ मंजूरी खेरीज कायदेशीर असणार नाही.' असे नमूद आहे. तसेच कोणत्याही गावक–यास त्याने गावात पाठविलेली गुरे चरण्यास मनाई करता कामा नये, अशी देखील अट आहे.

९. वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असताना ग्रामपंचायत तिसगांव यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाची परवानगी न घेता त्यांना कोणतेही अधिकार नसताना परस्पर ग्रामपंचायत ठरावाद्वारे वादातील जमीन भाडेपट्ट्याने बेकायदेशीरपणे याचिकाकर्त्यांना वाटप केली आहे आणि ज्या अटी शर्तीवर जमीन ग्रामपंचायतीकडे निहित केली होती त्या अटी शर्तीचा भंग केला आहे. तसेच महसूल व वनविभाग यांच्याकडील दि.१२.०७.२०११ रोजीच्या शासननिर्णयामध्ये क्र.९(२) नुसार गायरान अथवा गावक–यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणतीही व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजूर करण्यात येऊ नये अशी तरतुद आहे. ग्रामपंचायतीने या तरतुदीचा देखील भंग केलेला आहे.

१०. महसूल व वनविभाग शासन परिपत्रक क्र. जमीन–०७/२०१३/ प्र.क्र.३७४/ ज–१ दि.१०.१०.२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार शासकीय जमीनीवरील अतिक्रमणास प्रतिबंध करणे, अतिक्रमण निष्काषित करणे ही बाब सदर जमीन ज्या विभागाच्या ताब्यात आहे, त्या विभागाची जबाबदारी आहे. वादातील जमीन ग्रामपंचायतीकडे यापूर्वीच शासनाने निहित केलेली असल्यामुळे ती आजरोजी ग्रामपंचायत तिसगाव यांच्या ताब्यात आहे.

११. ग्रामपंचायत तिसगांव यांना कायदेशीर अधिकार नसताना त्यांनी जमीन वाटप केलेली आहे. त्यामुळे शासनाने वेळोवेळी अतिक्रमणाबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत. त्यानुसार वादींचे अतिक्रमण निष्काषित करणे गरजेचे आहे.

१२. मा. उच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे गटविकास अधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणीदरम्यान वादी व इतर अतिक्रमण धारक यांनी त्यांच्या वापरात असलेल्या मिळकतीमध्ये बांधकाम, व्यवसाय/गाळे, घरकुल वगैरे गट क्र.२९६ मध्ये असल्याचे मान्य केले आहे आणि ग्रामपंचायतीने ठराव करुन जागा भाडेतत्वावर कराराने इतर विविध कारणाने दिल्याचे सांगितले. त्यांनी तसा ठराव जोडला. सदर सुनावणी झाल्यानंतर गोपनीय अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करण्यात आला. त्यांनी दि.०८.०५.२०२४

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

रोजीच्या पत्रानुसार माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून त्यांनी दिलेल्या मुदतीमध्ये अतिक्रमणे हटविण्याबाबत कार्यवाही करण्याचे सुचित केले. त्यानुसार गटविकास अधिकारी यांनी वादी व इतरांना दि.१४.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये स्वतःहून अतिक्रमण काढण्याबाबत सुचविले, अन्यथा अतिक्रमण निष्काषित केले जाईल असे सुचित केले. या नोटीसच्या विरुध्द अतिक्रमणधारकांनी मा. उच्च न्यायालयात रीट दाखल केले. त्यामधील आदेशानुसार अनेक दावे न्यायालयात दाखल झाले आहेत.

१३. ग्रामपंचायतीने बेकायदेशीररित्या ठराव करुन जागा दिली असल्याचे दिसते, परंतू त्यामुळे सदर मिळकत मालकी हक्काने अथवा वापरण्याकरीता मिळण्याचा कोणताही अधिकार अतिक्रमण धारकांना नाही. तथाकथित भाडेपट्टा, तसेच नळजोडणी, घरपट्टी याला कायदेशीर आधार नसल्याने वादीस कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. सदर ठरावाबाबत कोणताही नोंदणीकृत दस्त नाही. वादीने जे भाडेपट्टयाने जागा दिल्याचे नमूद केले आहे तो भाडेकराराचा मुद्दा मा.उच्च न्यायालयात निकाली निघालेला आहे.

१४. सदरील गट क्र.२९६ च्या मध्यभागातून तिसगाव मिरी रस्ता जातो. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला अतिक्रमण झालेले आहे. तसेच या गटाच्या दक्षिण बाजूस नगर पाथर्डी रस्ता आहे. सदर मिळकत गायरान असल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालय यांच्याकडील जगपाल सिंह आणि इतर वि. स्टेट ऑफ पंजाब व इतर २०११ एस.सी.सी. ३९६ या केसमध्ये गायरान जमीनीवरील अतिक्रमण काढण्याचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. गायरान जमीनीतील अतिक्रमण निष्काषित करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने परिपत्रक काढलेले आहे. त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीने केलेले अतिक्रमण काढण्याचा अधिकार शासनास आहे.

१५. गट क्र.२९६ चे मोजमाप करुन हद्दी व खुणा निश्चित करणेकामी संबंधित प्रतिवादी यांनी अर्ज देऊन उपअधिक्षक भुमी अभिलेख पाथर्डी यांच्याकडून मोजणी करुन हद्दी खुणा कायम केल्या आहेत. त्यानुसार वादी व इतर यांनी अतिक्रमण केल्याचे शाबीत झाले आहे. त्यामुळे वादींना दावा दाखल करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. तरी वरील सर्व कारणास्तव प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

१५. प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी म्हणणे दाखल करुन वादींचे कथन नाकारले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर दाव्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, नोंदणी कायदा, कराराचा कायदा व महाराष्ट्र पंचायत कायदा कलम ५५ यातील तरतुदींची बाधा येते. मिळकतीचे वर्णन मोघम स्वरुपाचे असून ते अपुरे आहे. त्यामुळे दावा मिळकतीचे स्थानांकन निश्चित होत नाही. या सर्व कारणास्तव दावा रद्द होण्यास पात्र आहे.

१६. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, नमूद प्रतिवादी ही संबंधित कायदयातील तरतुदीप्रमाणे अस्तित्वात आलेली स्थानिक स्वराज्य संस्था असून त्यांचा कारभार त्या

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

कायदयातील तरतुदीप्रमाणे चालतो. त्यांच्यावर महाराष्ट्र शासनाचे निर्णय, आदेश परिपत्रके बंधनकारक असतात व त्यांना त्याची अंमलबजावणी करावी लागते. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचा कारभार जिल्हा पातळीवर तर गटविकास अधिकारी यांचा तालुका पातळीवर आणि विस्तार अधिकारी यांचा कारभार पंचायत समितीच्या स्तरावर चालतो. म्हणजेच ते शासनाने नियुक्त केलेले लोकसेवक आहेत. ग्रामसेवक हे ग्रामपातळीवर कार्य करत असतात. त्यांनी इतर सर्व कथने प्रतिवादी क्र.१ च्या जबाबाप्रमाणे नमूद केली आहेत.

१६. प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी नि.१६ अन्वये म्हणणे दाखल करुन वादींचे कथन नाकारले आहे आणि इतर प्रतिवादींच्या जबाबाप्रमाणेच कथने केलेली आहेत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी जे कागदपत्र सादर केले आहेत त्या आधारे वादीचा मालकी हक्क शाबीत होत नाही. ज्या ठरावाची प्रत वादीने सादर केली आहे, त्यामध्ये प्रतिवादी क्र.४ ने जागा कराराने व्यवसायासाठी दिलेली आहे असे दिसून येते. तत्कालिन सरपंच यांनी राजकीय हेतूने प्रेरित होऊन चुकीचा ठराव केल्याचे दिसते. त्यास कोणतीही शासकीय मान्यता नाही. तत्कालिन सरपंच व ग्रामपंचायतीचे मासिक मिटींगमध्ये सदर बोगस ठराव केलेला आहे, त्याबाबत कोणताही दस्त नोंदविलेला नाही. त्यासाठी शासनाची परवानगी घेतलेली नाही. तरी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

१९. वादी, प्रतिवादी यांनी केलेले कथन पहाता खालील मुद्दे माझ्या विचाराधीन असून त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह मी देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | होकारार्थी |
| २. | वादीच्या हक्कात न्यायाचा समतोल आहे काय ? | होकारार्थी |
| ३. | वादीच्या मागणीनुसार तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास त्याचे अपरिमित नुकसान होईल काय ? | होकारार्थी |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

२०. **वादी प्रतिवादींनी नमूद केल्याप्रमाणे मौजे तिसगांव येथील मिळकतीबाबत दाखल झालेल्या जनहित याचिकेमधील निर्देश, त्यानंतर झालेल्या निरनिराळ्या याचिका आणि त्यामध्ये दिलेले निर्देश यानुसार बरेच दावे दाखल झाले आहेत. त्या निर्देशामध्ये**

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

**नि.५ चे अर्ज दि.१५.०७.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी निकाली काढण्याचे आदेश आहेत. त्यानुसार हा दावा दाखल आहे.**

**२१. बरेच दावे दाखल असल्यामुळे वादी, प्रतिवादींनी मा. सर्वोच्च न्यायालयाचे काही न्यायनिर्णय तसेच शासनाचे परिपत्रक स्वतंत्ररित्या दाखल केले आहेत आणि या सर्व दाव्यांच्या कामी ही सर्व कागदपत्रे विचारात घ्यावीत, अशी विनंती केली आहे. त्यानुसार प्रत्येक दाव्यामध्ये सदर कागदपत्र विचारात घेत आहे.**

**मुद्दा क्र.१ ते ४ करीताः–**

२२. सर्व मुद्दे एकमेकांशी संबंधित असल्याने ते एकत्र विवेचनासाठी घेतलेले आहेत. वादी प्रतिवादींचे विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. उभय पक्षाने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे प्रतित होते की, दावा मिळकत मौजे तिसगांव, ता.पाथर्डी येथील जुना सर्वे क्र.१२६ याचा नवीन गट क्र.२९६ क्षेत्र ७ हे. ५९ आर ही मुळतः महाराष्ट्र शासनाच्या मालकीची असून त्यांनी सदर मिळकत तिसगांव ग्रामपंचायतीस काही अटी शर्तीवर वर्ग केली आहे. सदर मिळकत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९३३ कलम २८(ब) अन्वये ग्रामपंचायतीकडे वर्ग केल्याचे फेरफार क्र.२१५४ नुसार दिसते. सदर फेरफार मध्ये असे नमूद आहे की, ठराव क्र.२५१ व त्यानंतर वेळोवेळी झालेल्या ठरावास अनुसरुन सदर सर्वे क्र.१२६ गुरे चारणेसाठी खास नेमून दिलेली जमीन असल्यामुळे ग्रामपंचायत तिसगावकडे खालील शर्तीवर सोपविण्यात आली आहे.

१. कोणत्याही गावक–यांस त्याने गावांत पाठविलेली गुरे चरण्यास मनाई करता कामा नये मात्र पंचायतीने ठरविलेली चराईची फी असल्यास त्याने भरली पाहिजे.

२. चराऊ जमीनी चांगल्या स्थितीत ठेवल्या पाहिजेत.

३. अशा चराऊ जमीनीचा पंचायतीने केलेला भाडेपटटा, विक्री किंवा इतर रितीने केलेली तबदिली कलेक्टरच्या आगाऊ मंजूरीखेरीज कायदेशीर असणार नाहीत.

४. शर्तीचा भंग केल्याबद्दल त्या पंचायतीस नुकसान भरपाई न देता परत घेतल्या जाण्यास पात्र असतील.

२३. वरील मिळकतीपैकी ३० आर क्षेत्र महसूल मुक्त सारा मालकीने व कब्जा हक्काने श्री.उध्दवराव रघुनाथ वाघ सेक्रेटरी आदिनाथ कृषी विकास प्रतिष्ठान, आदिनाथ नगर पाथर्डी, अहमदनगर यांना तबदील केल्याचे तसेच याच मिळकतीपैकी २० आर जमीन दुरध्वनी खात्यास दुरसंचार केंद्रासाठी जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्या आदेशानुसार दिलेली आहे, असे प्रतिवादीने नमूद केले आहे आणि तसे फेरफार देखील दाखल केले आहेत.

२४. वरील सर्व बाबी उभय पक्षांना मान्य आहेत. ग्रामपंचायतीने काही कालावधीनंतर या गायरान जमीनीपैकी छोटे छोटे भुखंड करुन ब–याच लोकांना भाडेपट्टयाने दिले आहेत,

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

www.ecourtsindia.com



त्याचपैकी वादीचा भुखंड एक आहे असे वादीचे कथन आहे. सदर भुखंडावर बांधकाम करुन कोणाला व्यवसायासाठी तर कोणाला रहाण्यासाठी सदर जागा दिली आहे असे देखील वादीचे कथन आहे. वादीने सदर भुखंडावर बांधकाम केले आहे असे वादीचे कथन आहे.

२५. ग्रामपंचायतीने ठराव करुन वादीस सदर जागा भाडयाने दिलेली आहे. त्यानुसार वादी तेथे व्यवसाय करत असून नियमितपणे भाडे भरत आहे, असे देखील वादीने कथन केलेले आहे. सदर बाब ग्रामपंचायतीने देखील नाकारलेली नाही. त्यांनी केवळ असे कथन केले आहे की, फेरफार क्र.२१५४ मधील अटीशर्तीचा भंग करुन संबंधित ग्रामपंचायतीने अनाधिकाराने भाडेपट्टा/ करार /ठराव करुन वादीस दिल्याचे दिसते. सदर ठराव हे पूर्णपणे अनाधिकाराचे आहेत. म्हणून ते नमूद ग्रामपंचायतीवर बंधनकारक नाहीत. सदर भाडेपट्टे/ करारनामे मा. जिल्हाधिकारी, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची पूर्व परवानगी न घेता बेकायदेशीररित्या केलेले आहेत. संबंधित ग्रामपंचायतीने मोकळया गायरान/ खुल्या मिळकतीकडे दुर्लक्ष केले त्यामुळे नमूद ठिकाणी अतिक्रमण झाले आहे, सदर अतिक्रमण बेकायदेशीर असल्यामुळे ते निष्काषित करणे आवश्यक आहे.

२६. त्यांनी पुढे असेही कथन केले आहे की, दावा मिळकत ग्रामपंचायतीने भाडेकराराने/ भाडेपट्टयाने दिली आहे असे, वादीने नमूद केले आहे. परंतू सदर भाडेकराराचा मुद्दा माननीय उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे निकाली निघाला असून वादी व इतरांचा भाडेकराराचा मुद्दा फेटाळलेला आहे.

२७. मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिकेत, अथवा त्यांच्याकडे वादी व इतरांनी दाखल केलेल्या याचिकेमध्ये कुठलाही भाडेकराराचा मुद्दा निकाली काढल्याचे दिसत नाही. केवळ वादीने त्यांचा कायदेशीर ताबा असल्याचे शाबीत करण्यासाठी स्वतंत्ररित्या दावे दाखल करावेत एवढेच नमूद केले आहे. पुढे त्यामध्ये असे निर्देश आहेत की, व्यापारी गाळयामध्ये अतिक्रमण केलेल्या व्यक्तीने असे कथन केले आहे की, त्यांना ग्रामपंचायतीकडून जेवढी जागा भाडेपट्टयाने देण्यात आली होती त्या व्यतिरिक्त जागा त्यांच्या ताब्यात असेल तर ती त्यांनी स्वतःहून काढून/पाडून टाकायची आहे आणि सदर दुकाने मुळ करारानुसार तेवढयाच मोजमापाचे करायचे आहे. त्यांचे हे सदर कथन त्यांनी त्वरीत अंमलात आणायचे आहे. सदर निर्देश याचिका क्र.५६२७, ५०३१, ५०३६/२०२४ वगैरे पान ७ परिच्छेद क्र.८ (क)मध्ये नमूद आहेत.

c. The statement is made by the commercial shop encroachers that they would strictly maintain the originally allotted(by the Gram Panchayat) size of their commercial shops and beyond the originally allotted size of the shops, they would

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

themselves demolish/remove the structures and restore the shops to their original size, immediately. This statement shall be implemented and shall not be the subject matter of adjudication before the Civil Court.

२८. वर नमूद निर्देशावरुन असे प्रतित होते की, जी मुळ जागा ग्रामपंचायतीने भाडेपट्टयाने दिलेली आहे त्याव्यतिरिक्त दुकान मालकांच्या ताब्यात जास्त जागा असेल तर ते बांधकाम काढून दुकानाचे मोजमाप मुळ भाडेपट्टयानुसार करावयाचे आहे. म्हणजेच संपूर्ण दुकानच अतिक्रमित आहे असा याचा अर्थ नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीने जे कथन केले आहे की, भाडेकराराचा मुद्दा निकाली निघाला आहे त्यामध्ये तथ्य नाही असे मला वाटते.

२९. या प्रकरणामध्ये मुळ मुद्दा असा आहे की, ग्रामपंचायतीने वर नमूद फेरफार क्र.२१५४ नुसार जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या परवानगीने वादीस सदर जागा भाडेपट्टयाने दिली आहे काय? ग्रामपंचायतीने याबाबत केलेल्या कथनानुसार तात्कालीन ग्रामपंचायतीने अशी परवानगी घेतलेली नव्हती. मात्र ग्रामसभेत ठराव मंजूर करुन घेऊन वादीस जागा दिलेली आहे, याबाबत कोणताही वाद नाही. सदर ठराव बेकायदेशीर आहे किंवा काय याबाबत सविस्तर चौकशी करणे आवश्यक आहे. किंबहूना ग्रामपंचायतीने दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये तत्कालीन ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावाची प्रत दाखल आहे. या ठरावानुसारच वादीस दावा मिळकत भाडेपट्टयाने दिल्याचे दिसते. म्हणजेच ग्रामपंचायतीकडे सदर ठराव उपलब्ध आहे. वादीने देखील सदर ठराव दाखल केलेला आहे. या ठरावानुसार वादीस ११ महिने कराराने भाडयाने ग्रामपंचायतीच्या सर्व अटी व नियमास अधीन राहून दरमहा भाडे आकारुन जागा देण्यात यावी असे सर्वानुमते ठरल्याचे दिसते. मात्र अशा प्रकारचा भाडेकरार झाला आहे किंवा काय याबाबत उभयपक्षाने कोणतीही कथने केलेली नाहीत. मात्र त्यानुसार वादीच्या ताब्यात जागा दिल्याचे त्यांनी मान्य केले आहे. तसेच वादीने देखील भाडे भरल्याबाबत भाडेपावत्या दाखल केल्या आहेत.

३०. प्रतिवादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वादीने ग्रामपंचायतीच्या/ शासनाच्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे. सुरवातीचा ठराव अकरा महिन्याचा आहे, त्यानंतर नुतनीकरण केलेले नाही, करारनामा केलेला नाही, हस्तांतरणाची परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे वादीस या जागेवर ताबा ठेवण्याचा अधिकार नाही. ग्रामविकास अधिका–यांनी माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे प्रत्येक धारकाची चौकशी केली, त्यामध्ये या सर्व बाबी नमूद आहेत. तशी माहिती त्यांनी दाखल देखील केलेली आहे.

३१. त्यांनी वर नमूद माहितीचा तपशील दाखल केलेला आहे, त्यावरुन त्यांचे कथन सत्य असल्याचे दिसते. परंतू अकरा महिन्याची मुदत संपूष्टात आल्यानंतर ग्रामपंचायतीने पुढे

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

काय केले, हे नमूद केलेले नाही. किंबहूना वादीकडून नियमितपणे भाडे स्वीकारलेले आहे. म्हणजेच अप्रत्यक्षरित्या पुन्हा नवीन भाडेपट्टा अस्तित्वात आला, असे मिळकत हस्तांतरण कायदा कलम ११६ मधील तरतुदीनुसार अनुमान काढता येईल. सदर तरतुद खालीलप्रमाणे–

116. Effect of holding over–If a lessee or underlessee of property remains in possession thereof after the determination of the lease granted to the lessee, and the lessor or his legal representative accepts rent from the lessee or underlessee, or otherwise assents to his continuing in possession, the lease is in the absence of an agreement to the contrary, renewed from year to year, or from month to month, according to the purpose for which the property is leased, as specified in section 106.

३२. वरील तरतुदीनुसार भाडेपट्टयाचा कुठलाही करार नसला तरी नुतनीकरण झाले असेच म्हणावे लागेल. कारण ग्रामपंचायतीने भाडेपट्टयाचा कालावधी संपल्यानंतर वादीने जागा सोडावी म्हणून काय कार्यवाही केली याबाबत कोणतीही कथने केलेली नाहीत. तसेच शासनाने देखील कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसत नाही. ग्रामपंचायतीने जर जिल्हाधिका–याच्या परवानगीशिवाय सदर भाडेपट्टा केला आहे, तर फेरफार क्र.२१५४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर जागा परत घेण्याबाबत काय कार्यवाही केली याचा देखील बोध होत नाही.

३३. सदर गट क्र.२९६ हे गायरान आहे त्यामुळे त्यावरील अतिक्रमण निष्काषित करणे आवश्यक आहे असे प्रतिवादींचे कथन आहे. त्या संदर्भात त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णय मुलाधाराचा आधार घेतला आहे. सदर न्यायनिर्णय खालीलप्रमाणे आहे.

1. **Jagpal Singh** & **Ors Vs**. **State of Punjab** & **Ors in Civil Appeal No**.1132/2011 **decided on** 28.01.2011. The Hon'ble Supreme Court held that common village land/community land/ commons–encroachment of Gram Panchayat land–Regularisation of– Impermissibility– Held, illegal encroachments of village/Gram Panchayat lands shall not be regularised– Long duration of occupation or huge expenditure in making constructions thereon or political connections are no justification for regularising such illegal occupations– However, regularisation may be permitted where lease is granted to landless labourers or members of Scheduled Castes/ Scheduled Tribes, or where there

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

is already a school, dispensary or other public utility on said land– In present case, appellant unauthorisedly encroached village pond of Grampanchayat by filling it and raising constructions thereon– Collector directing regularisation of land by recovering its cost, since huge money was spent by apellants on said land–Held, Gram Sabha land must be kept for use of villagers of the village– common interest of villagers shall not suffer use of villagers of the village– Common interest of villagers shall not suffer merely because unauthorised occupation has been subsisting for many years– Hence, regularisation Letter dt.26.09.2007 by State Government in favour of unauthorised occupants, held, illegal, not valid and without jurisdiction–Constructions must be removed and possession shall be restored to Grampanchayat – Further held, orders issued by all State Governments permitting Gram Sabha land to private persons and commercial enterprises on payment of money are illegal and should be ignored – All State Governments are directed to prepare schemes for eviction of illegal/ unauthorised occupants of Gram Sabha/ Gram Panchayat/ poramboke/shamlat land and restoration to Gram Panchayat– Punjab Village Common Lands (Regulation) Act, 1961 (18 of 1961)

2. ***The Tehsildar Urban Improvement Trust & Anr Vs. Gangabai Menariya (dead) Thr. LRs. & Ors. in Civil Appeal No.722/2012***

३४. क्र.२ च्या न्यायनिर्णयामध्ये वादीने तो मिळकतीचा मालक आहे असे जाहीर होऊन मिळण्यासाठी आणि निरंतर मनाई हुकूमासाठी दावा दाखल केला होता. त्याचे असे कथन होते की, त्याने दावा मिळकत पंचायतीकडून खरेदी केली होती आणि तेथे बांधकाम केले होते. तर प्रतिवादीचे असे कथन होते की, सदर मिळकत ही गायरान आहे त्यामुळे ग्रामपंचायतीस सदर मिळकत भाडेपट्ट्याने देण्याचे अधिकार नाहीत. या प्रकरणात वादीचे कुठेही असे कथन नाही की, दावा मिळकतीचा तो मालक आहे. किंबहूना दावा मिळकतीमध्ये त्याचा भाडेपट्ट्यानुसार ताबा आहे एवढेच त्याचे कथन आहे. म्हणून या प्रकरणातील वस्तूस्थिती भिन्न आहे असे मला वाटते.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

३५. वर नमूद जगपाल सिंग या प्रकरणामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्य शासनांना गायरान/ सर्वसामान्य लोकांना वापरण्यासाठी असलेल्या ग्रामपंचायतीच्या खुल्या जागा इ. वरील अतिक्रमणे हटविण्यासाठी एक योजना तयार करावी असे निर्देश दिले आहेत. सदर प्रकरणामध्ये ग्रामपंचायतीच्या खुल्या जागेमध्ये अतिक्रमण झाले होते आणि सदर अतिक्रमण नियमित करुन मिळावे असा दावा दाखल होता, या प्रकरणात प्रतिवादींचे देखील तसेच कथन आहे. मात्र वादीच्या कथनाप्रमाणे ग्रामपंचायतीने ठराव करुन सदर जागा त्यांना भाडेतत्वावर दिलेली आहे. ग्रामपंचायतीने देखील अशा प्रकारचे ठराव झाल्याचे मान्य केले आहे, मात्र ते ठराव बेकायदेशीर आहेत असे त्यांचे कथन आहे. कारण जिल्हाधिका–यांची परवानगी ठरावापूर्वी घेतलेली नाही.

३६. सदर प्रकरणातील निर्देशाप्रमाणे राज्य शासनाने अतिक्रमण हटवण्याबाबत काय योजना तयार केली, याबाबत प्रतिवादीने कोणतेही कथन केलेले नाही. या न्यायनिर्णयास अनुसरुनच महसुल व वन विभागाने एक परिपत्रक दि.१२ जुलै २०११ रोजी काढल्याचे दिसते. मात्र यानुसार विशेष कृती कार्यक्रम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने तयार केला आहे काय याबाबत देखील प्रतिवादीने कोणतीही कथने केलेली नाहीत. किंबहूना सदर परिपत्रकानंतर किंवा शासन निर्णयानंतर देखील ग्रामपंचायतीने वेळोवेळी ग्रामसभेमध्ये ठराव घेऊन या मिळकतीतील जागा भाडेपट्टयाने दिल्याचे दिसते. अशा परिस्थितीत वादीचा ताबा बेकायदेशीर आहे काय, असा प्रश्न उपस्थित होतो.

३७. वादीच्या विधीज्ञांनी त्याबाबत असा युक्तीवाद केला की, दावा मिळकतीमध्ये वादीचा ताबा कायदेशीर आहे कारण ग्रामपंचायतीच्या ठरावानुसारच सदर ताबा वादीस दिलेला आहे. त्यामुळे जरी अकरा महिन्याचा कालावधी संपुष्टात आला असला तरी ग्रामपंचायतीने पुढील भाडे स्वीकारलेले आहे. त्यामुळे भाडेकरार जरी केला नसला तरी आपोआप भाडेपट्टयाचे नुतनीकरण झाले आहे. मुळ वाद शासन आणि ग्रामपंचायतीमध्ये आहे. त्याचा परिणाम वादीस भोगावा लागत आहे. वादी कायदेशीर रित्या ताब्यात असल्यामुळे कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय वादीस दावा मिळकतीतून बेदखल करता येणार नाही.

३८. त्याबाबत त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालय यांचे न्यायनिर्णय दाखल केले आहेत. परंतू सदर न्यायनिर्णय हे कायदयाच्या प्रस्थापित तत्वाबाबत आहेत. जेव्हा एखादी व्यक्ती कुठल्याही जागेच्या कायदेशीर ताब्यात असेल किंवा जरी अतिक्रमण धारक असेल तरी कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय त्यांना सदर जागेतून बेदखल करता येणार नाही. त्यामुळे त्या सर्व न्यायनिर्णयांचा उहापोह या ठिकाणी करत नाही.

३९. प्रतिवादींनी या प्रकरणात वादीस अतिक्रमण काढून घेण्याची नोटीस दिली आहे असे त्यांचे कथन आहे. तसेच त्यापूर्वी मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार गटविकास

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

अधिका–यांनी कागदपत्रांची पडताळणी करुन वादीस चौकशीची संधी देऊन ते अतिक्रमण धारक आहेत असा अहवाल दिलेला आहे. म्हणजेच योग्य रित्या चौकशी केलेली आहे आणि कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केलेला आहे असा देखील त्यांनी युक्तीवाद केला. परंतू त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन असे प्रतित होते की, मौजे तिसगांव गट क्र.२९६ मधील अनाधिकृत बांधकामाबाबत माहितीचा तपशील असे शीर्षक असलेल्या छापील नमुन्यामधील वादी व त्याच्या ताब्यातील जागेची माहिती केवळ भरलेली आहे. त्या सोबत रोजनामा म्हणून गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी यांच्यासमोरील कामकाज मौजे तिसगांव, ता. पाथर्डी येथील गट क्र.२९६ चे अतिक्रमण सुनावणी असे नमूद असून या सुनावणीची नोटीस वादीस दिल्याचे, ते सुनावणीसाठी उपस्थित असल्याचे आणि त्यांनी पान क्र.१ ते १७ झेरॉक्स प्रती कागदपत्र सादर केल्याचे नमूद आहे. म्हणजे पर्यायी जागा नाही त्यामुळे सहानभुतीपूर्वक विचार व्हावा अशी विनंती केली आहे, एवढाच रोजनामा आहे.

४०. वर नमूद रोजनाम्यावरुन ग्रामपंचायतीने काय कागदपत्र सादर केली किंवा त्यांना चौकशीसाठी बोलविण्यात आले किंवा नाही याबाबतचा बोध होत नाही. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सदर सुनावणी झाली आहे किंवा काय याचा देखील बोध त्यांनी दाखल केलेल्या रोजनाम्यावरुन होत नाही. त्यामुळे केवळ एकतर्फा माहिती भरण्यात आल्याचे दिसते. केवळ रोजनामा लिहिला म्हणून चौकशीचे कामकाज झाले असे म्हणता येणार नाही, असे मला वाटते.

४१. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदर गट क्र.२९६ मध्ये अतिक्रमण आहे किंवा काय, यासाठी त्या मिळकतीची मोजणी करण्यात आली. त्यामध्ये सदर मिळकतीवर अतिक्रमण असल्याचे आढळले. म्हणून सर्व अतिक्रमण धारकांना नोटीसा देण्यात आल्या आणि अतिक्रमण काढून घ्यावे असे कळविण्यात आले.

४२. वरील मुद्दयाबाबत वादीच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी यांनी मोजणीची नोटीस वादीस दिलेली नाही. सर्वे मॅन्युअलनुसार सर्व धारकांना व लगत धारकांना मोजणी नोटीस देणे बंधनकारक आहे. परंतू अशी कोणतीही नोटीस वादीस मिळालेली नाही. त्यामुळे सदर मोजणी विश्वासार्ह नाही.

४३. उभय पक्षाच्या युक्तीवादावरुन असे प्रतित होते की, सर्व धारकांना व लगत धारकांना मोजणी नोटीस दिलेली नाही. त्यामुळे कधी मोजणी केली आणि किती क्षेत्रामध्ये कोणाचे अतिक्रमण आढळून आले याचा सविस्तर तपशील समोर आलेला नाही. केवळ संदिग्ध मोजणी अहवाल प्रतिवादींकडे असल्याचे दिसते. प्रत्येक धारकाने किती क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे याचा देखील तपशील आलेला नाही. केवळ प्रतिवादी म्हणतात म्हणून वादीने अतिक्रमण केले आहे असे म्हणता येणार नाही.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

४४. वरील एकंदरीत चर्चेस अनुसरुन असे प्रतित होते की, महाराष्ट्र शासनाने ग्रामपंचायतीस काही अटी शर्तीवर दिलेली गायरान जमीनीपैकी ग्रामपंचायतीने ठराव करुन वादी व इतरांना भाडेकराराने दिली आहे, काही क्षेत्रावर ग्रामपंचायतीने स्वतः व्यापारी संकुल बांधून त्यामधील गाळे भाडयाने दिले आहेत. सर्व धारक त्यानुसार नियमितपणे भाडे भरत आहेत. सदर मिळकतीच्या ७/१२ उता–यास भोगवटादार सदरी सरपंच, ग्रामपंचायत यांच्या नावे ७ हे.१९ आर क्षेत्र फेरफार क्र.१२०४४ नुसार नमूद आहे. तलाठी कार्यालयाकरीता व भारत संचार निगम लिमिटेड यांच्या नावे प्रत्येकी २० आर क्षेत्र नमूद आहे. इतर अधिकारामध्ये ब वर्ग सरकारी बोअर पंप दोन दवाखान्याजवळ अशी नोंद आहे. या उता–यामध्ये गायरान जमीन असा कुठेही उल्लेख नाही.

४५. ग्रामपंचायतीने अटी शर्तीचा भंग करुन सदर जागा भाडेकराराने दिली असे शासनाचे कथन आहे. ग्रामपंचायतीने देखील तसेच कथन करुन तत्कालीन सरपंचाने राजकीय हेतूने प्रेरित होऊन चुकीचे ठराव केले असे पुढे नमूद केले आहे. परंतू सन १९९८ पासून सन २०२१–२२ पर्यंत देखील असे ठराव झालेले आहेत. त्यामुळे शासनाचे जे परिपत्रक आहे त्याचे पालन ग्रामपंचायतीने केल्याचे दिसत नाही. त्याबाबत शासनाने देखील कोणतीही कार्यवाही केली नाही. या सर्व प्रकारामध्ये वादी व इतरांचा काय सहभाग आहे, किंवा त्यांना या परिपत्रकाची माहिती आहे, तसेच सदर मिळकतीवर सरपंच ग्रामपंचायत यांचे नाव भोगवटादार सदरी असल्यामुळे शासनाने काय अटी शर्ती घालून ग्रामपंचायतीस जमीन दिली याची माहिती त्यांना आहे किंवा काय याबाबत प्रतिवादींनी कोणतीही कथने केली नाहीत. किंबहूना या सर्व अटी शर्तीची माहिती प्रतिवादींनी वादी व इतरांना दिली किंवा काय याबाबत देखील प्रतिवादी तर्फे कोणताही युक्तीवाद करण्यात आलेला नाही. त्यामुळे शासन आणि ग्रामपंचायतीमधील वादाबाबत सामान्य व्यक्तीस माहिती असण्याची कोणतीही शक्यता नाही, असे मला वाटते. ग्रामपंचायतीने वादी व इतरांना ठराव करुन जागा/गाळे भाडयाने दिले आहेत. सबब, प्रतिवादींच्या या कथनात तथ्य नाही असे माझे मत आहे.

४६. वादीच्या लाभात करुन दिलेला भाडेपट्टा नोंदणीकृत नाही, किंवा ग्रामपंचायतीने कोणताही करारनामा करुन दिलेला नाही किंवा काय, ग्रामपंचायतीने व तत्कालीन सरपंचाने चुकीचे ठराव केले किंवा काय, या ठरावानुसार वादी व इतरांना कोणतेही अधिकार प्राप्त होत नाहीत किंवा काय या सर्व बाबी अंतिम सुनावणीच्या वेळेस विचारात घेणे योग्य होईल, कारण त्यासाठी सखोल चौकशीची आवश्यकता आहे. सदर ठराव वेगवेगळया साली केलेले आहेत, त्यामुळे सर्वच ठरावाच्या वेळेस राजकीय हेतू होता किंवा तत्कालीन सरपंचाने असे चुकीचे ठराव केले असे या टप्प्यावर म्हणता येणार नाही.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

४७. सदर अर्जाच्या निर्णयासाठी वादीचा ताबा कायदेशीर आहे किंवा बेकायदेशीर आहे हे विचारात घेण्यापेक्षा त्यांच्या ताब्यात मिळकत कशाप्रकारे आली हे पहाणे महत्त्वाचे आहे. ग्रामपंचायतीने ठराव करुन वादी व इतरांना भाडेपट्ट्याने जागा/गाळे दिले, हे ग्रामपंचायतीने मान्यच केलेले आहे. त्यामुळे सदर ताबा कायदेशीर रित्या देण्यात आला आहे, असे अनुमान प्रथमदर्शनी काढता येईल. सबब, कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय केवळ अतिक्रमण केले आहे, असे गृहित धरुन प्रतिवादी वादीस दावा मिळकतीतून बेदखल करु शकत नाही. असे झाल्यास निश्चितपणे वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. कारण त्यांचा व्यवसाय/रहिवास तेथे असल्यामुळे त्यांना तेथून बेदखल केल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होईल. त्यामुळे दाव्याच्या या टप्प्यावर अर्ज मंजूर करणे योग्य होईल. सबब, मुद्दा क्र १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून, मुददा क्र ४ च्या निष्कर्षादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**: आदेश :**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधीमार्फत दावा मिळकतीची पाडापाड करु नये व वादीचे शांततामय कब्जा वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो देण्यात येतो.

३. अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावा.

CHARATE HAMPE MANISHA

Digitally signed by CHARATE HAMPE MANISHA
Date: 2024.07.24 10:57:53 +0530

(श्रीमती मनिषा द. [illegible])

दि.१९.०७.२०२४. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
अहमदनगर.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020016492024/truecopy/order-1.pdf

www.ecourtsindia.com